पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ६

**सभावृत्तांत**

दिनांक - **२०/०७/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२०/०७/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.सागर बाळासाहेब गवळी
५. मा.पवळे सुमनताई मधुकर
६. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
७. मा.कदम निकिता अर्जुन

या शिवाय मा.आष्टीकर – अति.आयुक्त (१), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.चव्हाण – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) मा.दत्तात्रय (काका) बाबुराव साने, विरोधी पक्षनेता यांना मा.महापालिका सभा माहे जुलै २०१८ च्या सभेस अनुपस्थित राहणेस परवानगी मिळणेबाबत – मा.संगिता ताम्हाणे, मा.उषा ढोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.२१ पिंपरीगांव मध्ये काशिबा शिंदे सभागृह पंपिंग स्टेशन डी.पी.रस्त्याने बाधीत होत असल्याने त्यासाठी पर्यायी व्यवस्था करणेचे कामातून प्रभाग क्र.२१ मधील जलनि:सारण विभाग विषयक कामे करणेबाबत – मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) सांगवी येथील वसंतदादा पाटील पुतळा स्थलांतर करणे व चौक सुशोभिकरण करणेबाबत – मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.४१ गांधीनगर येथील व्यायामशाळेचे नुतनीकरण करणे या कामाच्या स्थळबदलाबाबत – मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०६/०७/२०१८ व १३/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २०/०७/२०१८ विभाग – प्रशासन

सुचक : मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक : मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३४/२०१८, दि.३१/०३/२०१८

विषय – "ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)" अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - ०२

दिनांक - २०/०७/२०१८ विभाग – प्रशासन

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३५/२०१८, दि.३१/०३/२०१८

विषय – "स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ" अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सवानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २०/०७/२०१८

सुचक : मा.संगिता ताम्हाणे अनुमोदक : मा.उषा ढोरे

संदर्भ – मा.संगिता ताम्हाणे, मा.उषा ढोरे यांचा प्रस्ताव –

जगतगुरु संत तुकाराम महाराज पालखी नुकतीच आपल्या शहरात मार्गस्थ झालेली आहे. सदर पालखी बरोबर पंढरपुरला जाणेसाठी मा.दत्तात्रय (काका) बाबुराव साने, विरोधी पक्षनेता यांनी माहे जुलै २०१८ रोजी होणा-या मा.महापालिका सभेस अनुपस्थित राहणेस परवानगी देणेबाबत विनंती केलेली असल्याने मा.दत्तात्रय (काका) बाबुराव साने, विरोधी पक्षनेता यांनी माहे जुलै २०१८ रोजी होणा-या मा.महापालिका सभेस अनुपस्थित राहणेस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २०/०७/२०१८

सुचक : मा.ऊषा ढोरे अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.ऊषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.२१ पिंपरीगांव मध्ये काशिबा शिंदे सभागृह पंपिंग स्टेशन डी.पी.रस्त्याने बाधीत होत असल्याने त्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे (निविदा क्र.७/१/२०१६-१७) या कामाचे आदेश मे.संकल्प कन्स्ट्रक्शन यांना दिनांक २८/०७/२०१७ रोजी देण्यात आलेले आहेत. सदर कामांतर्गत काशिबा शिंदे सभागृह पंपिंग स्टेशन स्थलांतरीत करण्याचे काम सुरु असून २० ते २५ टक्के कामाची पुर्तता झालेली आहे. परंतु प्रभागामध्ये अमृत योजनेअंतर्गत कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र ते भाटनगर पिंपरीगाव मार्गे पवना नदीकडेने १००० मीमी व्यासाची अंदाजे ६ किमी गुरुत्वनलिका टाकण्याच्या कामास सुरुवात करण्यात येणार आहे. सदर कामामुळे पिंपरी वाघेरे, पिंपरी लो लेव्हल, वैभवनगर व डिलक्स पंपहाऊस आवश्यकता नसल्यामुळे बंद करण्यात येऊ शकतात. त्यामुळे काशिबा शिंदे सभागृह पंपिंग स्टेशन स्थलांतरीत करण्याचे काम केल्यास सदरचा खर्च वाया जाणार आहे. तरी सदर कामांतर्गत प्रभाग क्र.२१ पिंपरीगाव मध्ये काशिबा शिंदे सभागृह पंपिंग स्टेशन डी.पी.रस्त्याने बाधित होत असल्याने त्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे या कामातून प्रभाग क्र.२१ मधील इतरत्र जलनि:सारण विभाग विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २०/०७/२०१८

सुचक : मा.ऊषा ढोरे अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.ऊषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

सांगवी येथील वसंतदादा पाटील पुतळा स्थलांतरीत करणे व चौक सुशोभिकरण करणे या कामाची निविदा नोटीस क्रमांक ३/५४/२०१५-१६ आहे व सदर कामाचे आदेश क्र.कक्षे/नि.क/कावि/५९६/२०१५, दि.२७/११/२०१५ देण्यात आलेले आहेत. या कामांतर्गत प्रभाग क्र.३२ सांगवी येथे विविध ठिकाणी मा.नगरसदस्यांचे सुचनेनुसार स्थापत्य विषयक कामे करणे असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक – ०६

दिनांक – २०/०७/२०१८

सुचक : मा.ऊषा ढोरे अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.ऊषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.४१ गांधीनगर येथील व्यायामशाळेचे नुतनीकरण करणे या कामाचा आदेश निविदा ५४/०१/२०१७-१८ अन्वये दिनांक

२२/०१/२०१८ रोजी देण्यात आलेला आहे. परंतु प्रभाग क्र.४१ मधील व्यायामशाळेच्या इमारतीकामी स्ट्रक्चरल ऑडिटरच्या अहवालानुसार पहिला मजला धोकादायक असून तो पाडणे आवश्यक आहे. तरी तुर्त पहिला मजला पाडणेबाबत कार्यवाही करणे व राहिलेले शिल्लक काम प्रभाग क्र.९ मधील विविध भागांमध्ये स्थापत्य विषयक कामे करणेबाबत सदरच्या कामाचा स्थळबदल प्रभाग क्र.९ मध्येच कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४५९/२०१८
दिनांक : २१/०७/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.